■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २२ ● मंगळवार, दि. २१ ते २८ ऑक्टोंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## म हत्वाचे

### 'भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार'साठी प्रस्ताव सादर करण्यास २५ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ

मुंबई, दि. १५ : आदिवासी कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि सामाजिक संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत 'भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार' तसेच 'भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण संस्था पुरस्कार' देण्यात येतात. या पुरस्कारांसाठी प्रस्ताव स्वीकारण्यासाठी २५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जास्तीत जास्त व्यक्ती आणि संस्थानी प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात सादर करावेत असे आवाहन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले आहे. मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहन देणे, त्यांचा सन्मान करणे आणि त्यांच्या कार्याचा व्यापक प्रसार करणे तसेच आदिवासी समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करून इतरांना प्रेरणा देणे हा या पुरस्कारांचा उद्देश आहे. २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून या पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले असून, प्रकल्प कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २५ ऑक्टोबर २०२५ असून ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत या पुरस्कारांची छाननी प्रक्रिया होणार आहे. अधिक माहितीसाठी व्यक्ती व संस्थांनी प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले आहे.

### अण्णाभाऊ साठे महामंडळ थेट कर्ज योजना

#### लाभार्थ्यांची निवड २९ ऑक्टोबरला लॉटरी पद्धतीने होणार

वाशिम,दि.१७ ऑक्टोबर (जिमाका) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित वाशिम जिल्हा कार्यालयामार्फत थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्प मर्यादा एक लाख रुपये असून अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी निवड समितीकडे एकूण ६२ पात्र अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३४ पुरुष व २८ महिला अर्जदार असून, त्यातून १५ पुरुष व १५ महिला लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या मान्यतेनुसार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, वाशिम येथे लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड होणार आहे. पात्र अर्जांची यादी महामंडळ कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. तसेच अर्जदारांनी निवड प्रक्रियेसाठी निर्धारित वेळी उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक दिनेश पखमोडे यांनी केले आहे.

■ वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

## पत्रकारांना कॅशलेस आरोग्य सेवा देण्याबाबत समितीने अभ्यास करून प्रस्ताव द्यावा

**मुंबई, दि. १५ : राज्यातील पत्रकारांना कॅशलेस आरोग्य सेवा देण्यासाठी समिती स्थापन करावी. या समितीने महात्मा फुले जन आरोग्य योजना, केंद्र शासन आणि मध्यप्रदेश सरकारच्या योजनांचा अभ्यास करून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. पत्रकारांसाठी वर्षातून दोन वेळा विशेष आरोग्य शिबिर आयोजित करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. पत्रकारांच्या आरोग्य समस्यांबाबत मंत्रालयात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.**

बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आरोग्य सेवा आयुक्त कादंबरी बलकवडे, वैद्यकीय शिक्षण आयुक्त डॉ. अनिल भंडारी, माहिती व जनसंपर्क संचालक किशोर गांगुर्डे, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक, राज्य अधिस्वीकृती समिती अध्यक्ष यदु जोशी, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, मुंबई विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्ष दीपक कैतके, राज्य अधिस्वीकृती समिती सदस्य विनोद जगदाळे, नेहा पुरव, संजय मलमे, संजय पितळे, जयेश सामंत उपस्थित होते.

मध्य प्रदेश मधील पत्रकारांसाठीच्या कॅशलेस आरोग्य सेवा योजनेचा अभ्यास करण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्त, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे राज्य समन्वयक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि पत्रकार यांची समिती स्थापन करावी असे सांगून वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ म्हणाले की, या समितीने राज्य शासनाच्या आरोग्य योजना, केंद्राच्या आरोग्य योजना यांचाही अभ्यास करून सविस्तर सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करावा. त्यामध्ये 'सीएसआर'चाही विचार करावा. मोठ्या शहरांमध्ये पत्रकारांना कशा प्रकारे कॅशलेस आरोग्य सेवा देता येतील याचा त्यात प्रामुख्याने विचार व्हावा, असेही वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.

### पत्रकारांसाठी वर्षातून दोन वेळा विशेष आरोग्य शिबिर

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, पत्रकारांसाठी आरोग्य शिबिर घेताना महिला पत्रकारांसाठीही विशेष शिबिर घ्यावे, महात्मा फुले जन आरोग्य योजना पत्रकारांनाही लागू आहे. त्याच्या कार्डचे पत्रकारांना वाटप व्हावे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सध्या अस्तित्वात असलेली शंकरराव चव्हाण पत्रकार सन्मान निधी योजना आणखी व्यापक करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा असेही सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

यावेळी आरोग्य सचिव निपुण विनायक यांनी सध्या अस्तित्वात असणाऱ्या आणि पत्रकारांनाही लागू असणाऱ्या आरोग्य योजनांची सविस्तर माहिती दिली. तर पत्रकार संघाचे अध्यक्ष यदु जोशी यांनी पत्रकारांची भूमिका मांडली.

## लहान भावाच्या स्टेम सेल्स दानातून वाचले मोठ्या भावाचे प्राण

### ■ २५ लाखाच्या खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीची मदत

**मुंबई,दि.१५ : अकोला येथील १६ वर्षीय मुलाला रक्ताचा कर्करोग झाल्याने त्याच्यावर बोन मॅरो प्रत्यारोपण करणे आवश्यक होते. परंतु उपचाराचा खर्च कुटुंबाला उपचार परवडणारा नव्हता. या संकटाच्या काळात १२ वर्षीय लहान भावाने मोठ्या भावाला 'स्टेम सेल्स दान करून त्याचे प्राण वाचवले. तर आर्थिक मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने पुढाकार घेतल्याने हे उपचार शक्य झाले.**

जीवन (नाव बदलले आहे) हा १६ वर्षीय मुलगा आई-वडिल आणि १२ वर्षीय लहान भावासोबत अकोला येथे राहतो. वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही महिन्यांपासून जीवन सतत आजारी पडत होता.

सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात उपचार करूनही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्याला पुढील तपासणीसाठी मोठ्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिथे रक्त तपासणीतून जीवनला रक्ताचा कर्करोग असल्याचे निदान झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचाराकरिता बोन मॅरो प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. तसेच उपचारासाठी सुमारे २५ ते ३० लाख रुपये खर्चाचा अंदाज वर्तविला. या परिस्थितीत डॉक्टरांनी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत घेण्याचा सल्लाही दिला होता.

जीवनच्या पालकांनी तातडीने मुंबई गाठली. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षात धाव घेत, कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्याशी संपर्क साधला. रामेश्वर नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार तातडीने कार्यवाही केली. त्यातूनच मुंबई येथील जसलोक रुग्णालयात जीवनवर उपचार सुरू करण्यात आले. विविध स्त्रोतांतून मदतीचा हात

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून, टाटा ट्रस्टच्या मोठ्या योगदानातून तसेच काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने एकूण २५ लाखांची मदत उभी करण्यात आली. ४ सप्टेंबर २०२५ रोजी जीवनच्या १२ वर्षीय लहान भावाने अस्थिमज्जा (स्टेम सेल्स) दान केले आणि त्यानंतर जसलोक रुग्णालयात जीवनवर यशस्वी बोन मॅरो प्रत्यारोपण करण्यात आले.

जीवनप्रमाणे अनेक रुग्णांना मदतीचा हात जीवनप्रमाणेच अनेक गरीब व गरजू रुग्णांवर संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उपचार करण्यात येत आहेत.

दुर्धर आजार झाल्यास कोणीही हताश न होता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संपर्क साधावा. त्यासाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

## खाजगी कंत्राटी प्रवासी बसेस चालकांनी मनमानी भाडे आकारणीबाबत आवाहन

वाशिम - दिवाळीच्या सणानिमित्त प्रवाशांकडून जादा भाडे आकारणी होण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम, विशेष तपासणी मोहिम राबवत आहे. वाशिम जिल्ह्यातील सर्व खाजगी कंत्राटी प्रवासी बस वाहकांनी सणासुदीच्या काळात जास्त भाडे आकारल्यास, दि. २७ एप्रिल २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कारवाई केली जाईल. प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, जर एखाद्या खाजगी कंत्राटी बस वाहकाने शासनाने निर्धारित केलेल्या भाडेपेक्षा अधिक भाडे आकारले, तर त्यांनी तत्काळ ई-मेलद्वारे dyrto.37-mhgov.in या पत्त्यावर आपले संपूर्ण नाव, मोबाईल क्रमांक आणि तिकिटाची प्रत पाठवावी. यामुळे खाजगी कंत्राटी प्रवासी बस वाहकांवर मोटर वाहन कायद्याअंतर्गत योग्य ती कारवाई करण्यात येईल.असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप यांनी कळविले आहे.

# संस्कृतीचा शाश्वत दीप

जुन्या काळातील दिवाळी ही केवळ आनंदोत्सव नव्हती, तर ती जीवनशैलीचा अविभाज्य भाग होती. त्यात निसर्ग, श्रम, भक्ती आणि समाजभाव यांचा सुंदर संगम दिसून येत असे. 'दीपावली' या शब्दाचा अर्थ संस्कृतमधील 'दीप' म्हणजे दिवा आणि 'आवली' म्हणजे ओळ. म्हणजे दिव्यांची एक ओळ- दीपावली. इतिहास, पुराणे आणि ग्रंथांमध्ये या सणाचे विविध नावे आणि स्वरूप नोंदले आहे. जसे- यक्षरात्री, दीपमाला, दीपप्रतिपदुत्सव, दिवाळी, दीपिका, सुखरात्री, सुख सुप्तिका इत्यादी. पुराण, ज्योतिषशास्त्र आणि ऐतिहासिक ग्रंथांमध्ये या नावांचा उल्लेख आढळतो. दिवाळीतील तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा असतो. दिवाळीचा सर्वात तेजस्वी आणि मंगल दिवस. संध्याकाळी घराघरात दीपांच्या रांगा लागतात. मातीचे दिवे हे दिवाळीचे हृदय. चौथा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा किंवा पाडवा. या दिवशी राजा बळीच्या स्मरणार्थ लोक आनंदोत्सव साजरा करतात. 'इडा पीडा जावो, बळीचं राज्य येवो' असे म्हणत शुभेच्छा दिल्या जातात. दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज. भावंडांच्या प्रेमाचे प्रतीक. जुन्या काळातील ग्रामीण समाजात या सणाचा आणखी एक भावनिक पैलू होता. लग्नानंतर सासरी गेलेली नवविवाहित मुलगी दिवाळीची आतुरतेने वाट पाहत असे. आपल्या भावाच्या पावलांची चाहूल लागली की तिच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू चमकत. भाऊ मोठ्या आपुलकीने बहिणीला माहेरी घेऊन येत असे. तिला साडी-चोळी, दागिने, भेटवस्तू देत असे. माहेरी आल्यावर ती आठ-पंधरा दिवस आई-वडिलांच्या कुशीत राहून आनंद लुटत असे. परत सासरी जाताना तिच्या डोळ्यांत पाणी असे, पण मनात भावाच्या प्रेमाचा प्रकाश झळकत असे. या सुंदर परंपरेत भावनांचे आणि संस्कारांचे जे चित्र दिसते, ते आजच्या पिढीने जपले पाहिजे. पूर्वीच्या काळातील दिवाळी समाजातील एकोप्याचा आणि सामूहिक आनंदाचा उत्सव होती. शेजार्यांना गोडधोड पदार्थ देणे, एकत्र बसून दीपमाळा लावणे, गावात भजन-कीर्तन, हरिपाठ, लोकगीतं या सर्वांनी सामाजिक बांधिलकी मजबूत होत असे. गावातील चावडीवर दिवाळीच्या रात्री गप्पा, गोष्टी आणि हास्याचा गजर होत असे.

लोक म्हणत, दिव्यांच्या प्रकाशात मन उजळावं. आज त्या ठिकाणी मोबाइलवरील शुभेच्छा संदेश आले आहेत, पण मानवी स्पर्श आणि आपलेपणा थोडा हरवला आहे. महाराष्ट्रात दिवाळीची खास पद्धत आहे-घराची साफसफाई, रांगोळी, आकाशकंदील, फराळ, फटाके, अभ्यंगस्नान, नवविवाहित दांपत्यासाठी ओवाळणी, घरगुती आणि सामाजिक कार्यक्रम या सर्वांवर भर दिला जातो. मुलांनी मातीचे किल्ले तयार करणे, प्रदर्शने आयोजित करणे ही परंपरा राज्यभर प्रचलित आहे. दिवाळी अंक हा सांस्कृतिक वारसा ठरला आहे, ज्यातून साहित्य, कला आणि मनोरंजनाची परंपरा जपली जाते. काळाच्या ओघात दिवाळीचे स्वरूप बदलले आहे. शहरीकरण, ग्लोबलायझेशन आणि उपभोक्तावादामुळे सणाचे बाह्यरूप अधिक भडक झाले आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी सुवर्णसंधी

मुंबई दि. १८ : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एस.एस.बी. (SSB) कोर्स क्र. ६३ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीस हजर रहावे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग (Department of Sainik Welfare, Pune) च्या वेबसाईटवरून SSB-63 कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून ती पूर्ण भरून, मुलाखतीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.

पात्रता - या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडे पुढीलपैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे: १. कंबाईंड डिफेन्स सर्विसेस एक्झामिनेशन(CDSE-UPSC) किंवा नॅशनल डिफेन्स अकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) परीक्षा उत्तीर्ण, तसेच सर्विसेस सिलेक्शन बोर्ड (SSB) मुलाखतीसाठी पात्रता प्राप्त केलेली असावी. २. एनसीसी 'C' प्रमाणपत्र 'अ' किंवा 'इ' ग्रेडसह उत्तीर्ण, आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून यस एस एस बी डब्ल साठी शिफारस मिळालेली असावी. ३. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्स साठी (Technical Graduate Course) साठी SSB कॉल लेटर असणे आवश्यक. ४. विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी SSB कॉल लेटर किंवा शिफारस यादीत नाव असलेले असावे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे ईमेल (training.petenashik@gmail.com), दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअॅप नंबर ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे.

# प्रस्तावित बॅरेजसाठी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा करा

## लखन सिंह ठाकूर यांची मागणी



जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील धोडप, भापूर, मसलापेन, बालखेड आणि आसेगाव या पाच कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करून पाणी साठवण क्षमता वाढवावी आणि सिंचनक्षेत्र विस्तारित करावे, अशी मागणी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे भाजपा पदाधिकारी लखनसिंह ठाकूर यांनी केली आहे.

रिसोड तालुका सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत मागासलेला असून, विकासासाठी कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर होणे अत्यावश्यक असल्याचे ठाकूर यांनी सांगितले. याआधी लखनसिंह ठाकूर यांच्या मागणीनुसार तत्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी पळसखेडा प्रकल्पाला गती देऊन तो कार्यान्वित केला होता.

या पृष्ठभूमीवर ठाकूर यांनी आता पैनगंगा खोऱ्यातील या पाच प्रस्तावित बॅरेजचा प्रश्न गांभीयनि घ्यावा, अशी विनंती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली आहे. मंगरुळनाथ तालुक्यातील मंगळसा प्रकल्प २०२३ मध्ये रद्द झाल्याने त्या प्रकल्पाचे ४.६४ दलघमी पाणी धोडप व भापूर बॅरेजसाठी वळविणे शक्य आहे, हा मुद्दा ठाकूर यांनी ना. महाजन यांच्या निदर्शनात आणून दिला.

धोडप व भापूर बॅरेजसाठी पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देणे शक्य असल्याचे ठाकूर यांनी स्पष्ट केले. त्यांनी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांना विनंती केली की, जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभाग, नाशिक यांना आवश्यक निर्देश द्यावेत, जेणेकरून या प्रकल्पांचा मार्ग मोकळा होईल.






**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करु या – पो.नि. चव्हाण

रिसोड : दिपावली हा आनंदाचा आणि उत्साहाचा सन असतो, यंदा दिवाळी साजरी करताना ही प्रदूषण मुक्त व पर्यावरणपुरक साजरी करावी, असे आवाहन पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी केले आहे.



दिवाळी साजरी करत असताना आपला आनंद इतरांसाठी नव्हे तर आपल्या स्वतःसाठी नुकसानदायी ठरणार नाही, याचा विचार करणे गरजेचे आहे. तेजस्वी दिव्यांनी सजलेली, फुलांच्या माळांनी सजलेली आणि भरपूर स्वादिष्ट मिठाईचा गोडवाअसलेली ही दिवाळी सर्वत्र मोठ्या आनंदाने साजरी करावी. दिवाळी हा सण खुप आनंद आणि नवीन उत्साह घेऊन येत असतो, सध्याच्या काळात दिवाळी निमित्त फटाके, रसायन आणि प्लास्टीकचा वापर वाढतो, परिणामी दिर्घकाळ प्रदुषण होते, या प्रदुषणापासून आपले पर्यावरण वाचविणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वांनी पर्यावरणपुरक दिवाळी साजरी करण्याची नितांत गरज आहे.

दिवाळी साजरी पर्यावरणासाठी अधिक चांगली बनविण्याकरीता पहिली आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे फटाके नाकारणे आवश्यक आहे. फटांक्यामुळे अधिक प्रमाणात प्रदूषण होत असते, दिवाळी निमित्त अनेकजण एकमेकांना भेट वस्तू देत असतात. अशावेळी प्लास्टीक गिफ्ट रॅपरर्स वापरण्याऐवजी रिसायकल केलेले रॅपिंग पेपर वापरावे, दिवाळी निमित्त फटाके फोडण्या करीता लहान मुले अधिक आग्रही असतात. फटाक्यांमुळे काही जणांना दुखापतही होते. त्यातच फटांक्याच्या धुरामुळे प्रदूषण होते. त्यामुळे घरातील ज्येष्ठ मंडळींनी आपल्या मुलांना फटाक्यांपासून दूर ठेवणे ही काळाची गरज आहे. फटाका मुक्ततेतून पर्यावरणपुरक दिवाळी साजरी करण्या करीता सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन देखील पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी केले आहे. ता. प्र.

## आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक पद्धतीने वस्त्र धुलाई

मुंबई, दि १५ : सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील ५९३ शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता, सुरक्षितता आणि निर्जंतुक सेवा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आरोग्य भवन येथे यांत्रिक पद्धतीने वस्त्र धुलाई सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमामुळे राज्यातील २० जिल्हा रुग्णालये, आठ सामान्य रुग्णालये, १०५ उपजिल्हा रुग्णालये, ३७८ ग्रामीण रुग्णालये, २२ महिला रुग्णालये आणि ६० ट्रॉमा केअर युनिट्स अशा राज्यातील एकूण ५९३ आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक पद्धतीने वस्त्र धुलाई सेवेद्वारे रुग्णसेवेची गुणवत्ता उंचावली जाणार आहे. या सर्व संस्थांमध्ये २९,३१५ खाटांची क्षमता आहे. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, राज्यात आरोग्य सेवांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येत असून आता यांत्रिकी वस्त्र धुलाई सेवेच्या शुभारंभामुळे रुग्णालयांमधील स्वच्छता, शिस्त आणि रुग्णसेवेचा दर्जा आणखी उंचावेल. महाराष्ट्रात सुरू झालेली यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा देशासाठी पथदर्शी ठरेल.

# १० हजारपेक्षा जास्त मुक्या प्राण्यांना जीवनदान देणारे डॉक्टर कुंदनसिंह ठाकुर

## प्राण्यांच्या लंपी आजारावर होमिओपॅथीकचे प्रभावशाली उपचार

**रिसोड प्रतिनिधी**

वाशिम जिल्हा नव्हे तर अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या लंपीमुळे ग्रस्त असलेल्या 10 हजार पेक्षा जास्त जनावरांना आपल्या होमिओपॅथिक च्या उपचारामुळे तीन तासात बरे करणारे रिसोड चे डॉ. कुंदन सिंह ठाकुर यांनी वाशिम जिल्ह्यासह यवतमाळ, बुलढाणा, जालना,परभणी, भंडारा, संभाजीनगर, हिंगोली, नांदेड, लातूर या जिल्ह्यातही लंम्पीग्रस्त जनावरांना जीवनदान देण्याचे काम केले आहे. आश्चर्याची बाब म्हणजे हे सर्व उपचार कुंदन सिंह ठाकुर यांनी मोफत केले आहे.



अजूनही सुरू आहे.शेकडो किलोमीटर दूरवरून शेतकरी आपल्या जनावरांना वाचण्यासाठी रिसोड येथून कुंदन सिंह ठाकुर यांच्या जवळून औषधी नेत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळत आहे. हजारो रुपये खर्च करून ऑलीओपॅथिक व इतर आयुर्वेदिक उपचार करून सुद्धा लंम्पीवर कोणताही प्रकारचा प्रभाव जनावरांमध्ये होत नसल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्यांना कुंदन सिंह ठाकुर यांनी खूप मोठा दिलासा दिलेला आहे.

**मुक्या जनावरांसाठी उपचार मोफत**

आपली जनावरे आपल्या डोळ्यासमोरच तडफडत असताना शेतकऱ्यांना पहावसे वाटत नव्हते. अनेक शेतकऱ्यांनी तर आपली जनावरे वाचतील याची आशा सोडून दिली. मात्र रिसोड येथील डॉक्टर कुंदन सिंह ठाकुर यांच्या होमिओपॅथिक उपचाराबद्दल ज्या शेतकऱ्यांना माहिती मिळेल तो धावत येऊन औषधी घेऊन जात आहे. 3 तासातच जनावरे हे टवटवीत होत असून चारा खाने, पाणी पिणे, गाठी विरघळणे,सूज कमी होणे व थेट कामाला लागणे असे प्रकार होय आहे.यामुळे सद्यस्थितीत कुंदन सिंह ठाकुर यांचा उपचार चर्चेचा विषय ठरत आहे. डॉक्टर ठाकूर यांनी सद्यस्थितीत एका महिन्यातच दहा हजार जनावरावर हा उपचार केला असून मागील वर्षी 15000 जनावरावर त्यांनी मोफत उपचार केलेला आहे. अशाप्रकारे आतापर्यंत एकूण 25000 जनावरांवर उपचार करून लंपी पासून मुक्त केले आहे.

> “ महागड्या औषधी व प्रत्येक प्रकारचा उपचार करून सुद्धा माझ्या जनावर कोणत्याही प्रकारचा फरक पडला नाही. मात्र डॉक्टर कुंदनसीह ठाकूर यांच्या अत्यंत कमी औषधी मध्ये तीन तासातच उपचार झाल्याने माझी अनेक जनावरे लंम्पी मुक्त झालेली आहे. यामुळे माझा खूप मोठा नुकसान टळला असून जनावरे वाचलेली आहे.
>
> – **दिलीप आरे,** पानकनेरगाव जिल्हा हिंगोली

> “ माझ्याकडे दहा ते बारा जनावर असून सर्वच्या सर्व लंम्पीग्रस्त झाली होती. यामध्ये गाय,बैल, वासरू यांचा समावेश होता. महागडे औषध वापरून सुद्धा कोणत्याही प्रकारचा फरक पडला नाही. माझी जनावरे वाचतील अशी आशा मी सोडून दिली होती. मात्र डॉक्टर कुंदनसीह ठाकूर यांच्या औषधी मुळे माझी सर्व जनावरे वाचली.
>
> – **आकाश संजय बोराडे,** कळंबेश्वर जिल्हा बुलढाणा

## जिल्हा परिषद प्रा.शाळा चिचांबापेन विद्यार्थ्यांनी केली आनंददायी दिवाळी साजरी

**रिसोड:दि.१८/१०/२०२५ रोजी जिल्हा परिषद शाळा चिंचांबापेन ता. रिसोड जि.वाशिम येथे दरवर्षी प्रमाने यावर्षीही शाळेत "विद्यार्थ्यांना आकाशकंदिल तयार करण्याची कृती शाळेत शिकवली गेली व दुसया दिवशी म्हणजे "धनत्रयोदशी" या दिवशी शनिवारी आनंददायी शनिवार मध्ये, सर्व विद्यार्थ्यांनी तयार करून आणलेले आकाशादिवे एका रांगेत बांधले. तसेच शाळेत रांगोळी, दिवे लावण्यात याले या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना 'गोड खाऊ वाटप करण्यात आला. तसेच शाळेत मुलांनी फटाके फोडून आनंद साजरा केला. तसेच मु.अ. श्री मानवतकर सर यांनी सर्व विद्यायार्थना" दिवाळी अभ्यास "दिला. व श्री हसन शेख सर, श्री प्रमोद पवार, श्री महेश चकाण सर यांनी सर्वांनी सामुहिक प्रयत्न करून शाळेत आनंदायी दिवाळीचा दिपोत्सव साजरा करून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.**



# विस्फोटकांची साठवणूक व विक्रीस आळा बसविण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक

वाशिम,दि.१४ ऑक्टोबर (जिमाका) दिवाळी सणानिमित्त बेकायदेशीपणे विस्फोटकांची साठवणूक करणे व त्याची विक्री करण्यास आळा बसावा. याकरीता जिल्हयातील निवासी उपजिल्हाधिकारी यांना जिल्हयासाठी, उपविभागीय दंडाधिकारी,वाशिम, मंगरूळपीर व कारंजा यांना त्यांच्या उपविभागाकरीता,तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,वाशिम, मालेगांव,रिसोड,कारंजा,मंगरुळपीर व मानोरा यांना त्यांच्या तालुक्याकरीता व नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,वाशिम,मालेगांव, रिसोड,कारंजा,मंगरुळपीर आणि मानोरा यांना त्यांच्या क्षेत्राकरीता विस्फोटक अधिनियम २००८ चे नियम १२८ नुसार १५ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीसाठी अधिकार प्रदान करण्यात आले आहे. या अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकार क्षेत्रातील उपविभाग व तालुक्यामध्ये नगर पालिका क्षेत्रामध्ये नगर पालिका व ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायती ठरवतील,अशा खुल्या जागेत व पटांगणामध्ये फटाक्यांची दुकाने लावली जातात.तर सार्वजनिक ठिकाणी,निवासी इमारतीमध्ये, गर्दीच्या ठिकाणी फटाक्यांची विक्री व साठवणूक केली जाणार नाही.याची दक्षता घेवून अशा ठिकाणी लावल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या दुकानांची व अवैध फटाके दुकानांची तपासणी करण्यात यावी. जे परवानाधारक अटी व शर्तीचे पालन करणार नाही,अशा दोषी फटाके परवानाधारकांवर विस्फोटक नियम २००८ च्या नियम १२८ नुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.असे जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आदेशात नमुद केले आहे.